# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
## कोकण परिमंडळ कार्यालय
## ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी

---

**ग्राहक तक्रार क्र. १७/२०१४** **दि. ०१.०८.२०१४**

| | |
|---|---|
| मे.केन केमिकल्स प्रायव्हेट लि.<br>ई २७/२ एम्.आय.डी.सी. लोटे<br>परशुराम, ता. खेड<br>जि. रत्नागिरी. | तक्रारदार ग्राहक |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| अधिक्षक अभियंता, महावितरण<br>मंडल कार्यालय, रत्नागिरी | विरुध्द पक्षकार |
| फोरम उपस्थिती | १) श्री. डी. एस्. जामखेडकर, अध्यक्ष<br>२) श्री. व्ही.बी.जगताप,<br>सचिव तथा कार्यकारी अभियंता<br>३) श्री.ज. पु. बिवलकर<br>सदस्य |
| ग्राहकाच्या वतीने | १) श्री. कुंदन रामचंद्र मोरे<br>२) श्री. शशिकांत यशवंत वैद्य (प्रतिनिधी) |
| विरुध्द पक्षकाराच्या वतीने | १) श्री. डी.एस.दिवटे<br>मंडल कार्यालय<br>उपकार्यकारी अभियंता, रत्नागिरी |

## महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग, ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल (ओम्बुडस्मन) विनिमय २००६ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :

मे.केन केमिकल्स प्रायव्हेट लिमीटेड, ई २७/२, एम्.आय.डी.सी. लोटे परशुराम ता.खेड, जि.रत्नागिरी यानी त्यांच्या ग्राहक क्रमांक २२१०२९०१०५२० या कनेकश्नसाठी येणाऱ्या बीलामधील माहे जून २०१४ च्या बीलामध्ये एकूण ५०१८२ युनिटचा अतिरिक्त (Adjustment) वापर दाखवून महावितरणकडून वीज बीलाची आकारणी केल्याबाबतची तक्रार फॉर्म 'अ' मध्ये या मंचाकडे दि.०१.०८.२०१४ रोजी दाखल केली. तक्रार दाखल होताच अधिक्षक अभियंता, मंडल कार्यालय रत्नागिरी यांचेकडे मंचाचे पत्र क्रं. ११४ दि.०२.०८.२०१४ अन्वये स्पष्टीकरण मागविणेत आले, सदर पत्रास अनुसरुन महावितरणकडून दि.२६.०८.२०१४ रोजी स्पष्टीकरण प्राप्त झाले, त्यानंतर अधिनियमामधील तरतुदीनुसार दि.०९.०९.२०१४ रोजी सुनावणीची प्रक्रिया पुर्ण करणेत आली.

अर्जदाराच्या तक्रारीचे स्वरुप असे की, त्यांचा वर उल्लेख केलेल्या पत्त्यावर औद्योगिक कारखाना असून त्यासाठी त्यानी H.T. कनेक्शन घेतलेले आहे. महावितरणकडून त्याना प्राप्त झालेल्या माहे जून २०१४ च्या वीजदेयकामध्ये एकुण ५०१८२ युनिटची अडजस्टमेंट दाखवून एकूण १५०५४७ युनिटचे देयक त्याना देणेत आलेले आहे. सदर वीज देयक प्राप्त होताच ग्राहकानी महावितरणकडे रीतसर अर्ज करुन हया अडजस्टमेंट युनिटबाबत माहिती विचारली पण त्याना कोणतीही माहीती दिली नाही पण उलटपक्षी दि.२४.०७.२०१४ रोजी वीज पुरवठा खंडीत करण्याची नोटीस माहवितरणकडून देणेत आली आहे, त्यामुळे नियमानुसार बीलामध्ये दुरुस्ती करुन देण्यात यावी तसेच, वीज पुरवठा खंडीत करण्याबाबत दिलेल्या नोटीशीला स्थगिती दयावी अशी विनंती करुन अर्जदारानी आपली तक्रार मंचाकडे दाखल केलेली आहे.

महावितरणकडून दाखल करणेत आलेल्या स्पष्टीकरणामध्ये नमुद करण्यात आले आहे की १ जुलै २०१४ रोजी रिडींग घेतवेळी त्याच्या मीटरमध्ये एका फेजचे व्होल्टेज कमी दाखवत होते त्यामुळे ग्राहकाचा जोडभार व त्या महीन्यामध्ये नोंद करणेत आलेला वीजवापर याचा तुलनात्मक अभ्यास करुन ग्राहकाच्या बीलामध्ये एकूण नोंद झालेल्या युनिट व्यतिरिक्त १/३ युनिटची अडजस्टमेंट दाखवून १५०५४७ युनिटची वीज देयक ग्राहकास अदा करणेत आलेले आहे.

दरम्यान ग्राहकानी विनंती केल्यामूळे व अधिनियमामधील तरतुदीनुसार तक्रारदारानी रु. ६,५०,००००/- (रु. सहा लाख पन्नास हजार मात्र) भरण्याच्या अटीवर महावितरणकडून देणेत आलेला नोटीशीस स्थगिती आदेश देणेत आली.

दि. ०४.०९.२०१४ रोजी घेणेत आलेल्या सुनावणीमध्ये अर्जदार स्वतः श्री. कुंदन रामचंद्र मोरे तसेच श्री. शशीकांत वैद्य हे ग्राहक प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते तसेच महावितरणच्या वतीने श्री. डी.एस्.दिवटे उपकार्यकारी अभियंता यानी सुनावणीमध्ये भाग घेतला.

श्री. वैद्य यानी ग्राहकाच्या वतीने युक्तीवाद करताना नमुद केले की, हे कनेक्शन मार्च २०११ पासून नियमीत सुरु असून येणारी वीज देयके ते वेळोवेळी भरत आहेत. पण जून २०१४ मध्ये

अतिरिक्त आकारणी करुन वीज देयक दिलेले असल्यामुळे त्याचा भरणा केलेला नाही. या अतिरिक्त आकारणीसाठी विचारणा करणेसाठी लेखी निवेदन दिले पण त्यास कोणतेही उत्तर महावितरणकडून देणेत आले नाही पण वीजपुरवठा खंडीत करण्याबाबत नोटीस मात्र देणेत आलेली आहे. सदर नोटीशीसाठी उत्तर देऊन सहा महीन्याच्या सरासरी वापराप्रमाणे रु.६,४२,४९१/- भरण्याची तयारी दर्शविली आहे पण वीजपुरवठा खंडीत होण्याच्या भितीपोटी हा अर्ज मंचाकडे दाखल केलेला आहे. मंचाकडून देणेत आलेल्या स्थगिती आदेशानुसार रु. ६,५०,०००/- इतकी रक्कम यापुर्वीच त्यानी महावितरणकडे भरलेली आहे. महावितरणकडून देणेत आलेल्या स्पष्टीकरणामध्ये मीटरचा एक फेज फॉल्टी असल्याचे नमुद करण्यात आले आहे त्यामुळे अधिनियमामधील तरतुदीनुसार मीटर फॉल्टी आहे असाच त्याचा अर्थ होत असून महाराष्ट्र वीज नियामक आयोग (वीजपुरवठा संहीता व पुरवठयाच्या इतर अटी ) अधिनियम २००५ मधील विनिमय १५.४.१ मधील तरतुदी इथे लागू होतात व त्या तरतुदीनुसारच बील दुरुस्त होणे गरजेचे आहे. त्यामुळे अदा करणेत आलेले वीज देयक रद्द करुन ते अधिनियामधील तरतुदीनुसार दुरुस्त करणेत यावे, या मध्ये कोणतेही व्याज अथवा दंड लागू नये तसेच या सर्व प्रकारामध्ये झालेल्या त्रासाबद्दल नुकसान भरपाई देणेत यावी अशी विनंती करणेत आली.

महावितरणच्या वतीने युक्तिवाद करताना श्री. दिवटे उपकार्यकारी अभियंता यानी नमुद केले की तक्रारदाराची मागणी रास्त आहे, मीटरचा एक फेज कमी व्होल्टेज दाखवित असल्यामुळे १/३ अतिरिक्त आकारणी करणेत आली होती पण आयोगाच्या सप्लाय कोड मधील विनियम १५.४.१ नुसार योग्य त्या सुधारणा केल्या आहेत व पुर्वीच्या १५०५४७ युनिटच्या बीलाऐवजी ९९८०३ युनिटच्या आकारणी करुन तसे देयक देण्यात येईल तसेच ग्राहकाकडून भरणेत आलेली रक्कम अतिरिक्त असल्यास ती वीज बीलामधून क्रेडीट देणेत येईल.

प्रस्तुत प्रकरणामध्ये दाखल करणेत आलेली कागदपत्रे व उभयपक्षानी केलेला युक्तीवाद याचा अभ्यास करता ग्राहकाची तक्रार मान्य करणेत येत आहे. तसेच महावितरणकडून देखील ग्राहकाची तक्रार मान्य करणेत आली असून महाराष्ट्र वीज नियामक आयोग (वीज पुरवठा संहीता व पुरवठयाच्या इतर अटी ) अधिनियम २००५ मधील विनिमय क्रं. १५.४.१ मधील तरतुदीसार वीज देयक दुरुस्त करणेची तयारी दर्शविणेत आलेली आहे. सबब महावितरणकडून सुनावणी मध्ये कबुली दिल्याप्रमाणे जून २०१४ च्या वीज देयकाची दुरुस्ती करणे योग्य होईल असे मंचाचे मत आहे.

मंचाने नोंदविलेल्या वरील निष्कर्षानुसार खालील प्रमाणे आदेश देणेत येत आहे.

# आदेश

**१) ग्राहकाची तक्रार मान्य करण्यात येत असून जून २०१४ चे वीज देयक रद्द करणेत येत आहे.**

**२) महावितरणने योग्य ते सुधारित देयक तयार करुन दि. १५.१०.२०१४ पर्यन्त ग्राहकास अदा करावे तसेच भरणेत आलेली रक्कम अतिरिक्त असल्यास त्याची क्रेडीट भरणा रक्कम म्हणून पुढील बीलामध्ये वजावट दयावी.**

**३) मंचाकडून या प्रकरणात देणेत आलेला स्थगिती आदेश रद्द करणेत येत आहे.**

४) महावितरणने वरील आदेशाची पुर्तता करुन, पुर्तता अहवाल या मंचाकडे दि.२०.१०.२०१४ पर्यन्त सादर करावा.

५) या आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.

पत्ता :-सचिव,
विद्युत लोकपाल,
महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग,
६०६/६०८, केशवा,
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५१.
फोन नं. ०२२- २६५९२९६५

| | | |
|---|---|---|
| श्री. डी. एस्. जामखेडकर | श्री. व्हि. बी. जगताप | श्री. ज. पु.बिवलकर |
| अध्यक्ष | सचिव / कार्यकारी अभियंता | सदस्य |
| ग्रातनिमं, कोकण परिमंडल | ग्रातनिमं, कोकण परिमंडल | ग्रातनिमं, कोकण परिमंडल |

दिनांक :- २३.०९.२०१४
ठिकाण :- रत्नागिरी.